*S, S, CO.*

संगीत

# चित्रवंचना नाटक

[illegible]

हें पुस्तक

**वासुदेव वामन खरे**

यांनीं रचिलें

तें

**पुणें येथें**

‘ आर्यभूषण ’ छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं
छापिलें व **वासुदेव वामन खरे** यांनीं
**मिरज** येथें प्रसिद्ध केलें.

---

शके १८३८ इ. स. १९१७.

---

२-७५

किंमत ~~बारा आणे~~.

# प्रस्तावना.

—:•:—

या नाटकांत नायिका व तिची सखी यांनीं आपआपसांत नांवें व स्थानें ब लून नायकास फसविण्याचा उद्योग केला आहे एवढयावरून 'संदेश' पत्रा आक्टोबर १९१६ च्या एका अंकांत कोणीं एकानें असें प्रसिद्ध केलें कीं, हें म नाटक भास कवीनें केलें असून तेंच 'चित्रवंचना' नांव देऊन मीं मराठींत उत आहे! आधीं भास कवीचें असलें संविधानक माझ्या पाहण्यांत नाहीं, आ त्यांतून ही कल्पना सुचायला भासासारख्या प्राचीन कवीकडे धांव घेण्याचें कारण नव्हतें! नांवें व स्थानें बदलण्याची ही कल्पना सामान्य असून ती इंग्रजी नाट कादंबऱ्यांतून व आमच्या इकडच्या जुन्या गोष्टींतून कोणच्याना कोणच्या त रूपानें पुष्कळदां आलेली आहे. अशीच एक गोष्ट थोरले शाहूमहाराजांच्या बखरी (पृ. ५) नमूद आहे, ती वाचून मला या नाटकाचें संविधानक रचण्याची प्र स्फूर्ति झालेली आहे! कुणीकडे भासकवि आणि कुणीकडे आमचे बखरवा चिटणीस!

नाटक बसवितांना प्रयोगास अनुकूल असे पुष्कळ फेरफार मूळ पुस्तकांत कर लागले. त्या कामीं मला 'शिवराज संगीत मंडळी'चे मालक रा. रा. गो सदाशिव टेंबे व स्टेज डिरेक्टर रा. रा. राजाराम नारायण पुरोहित यांच्या सल्ल्या मोठा उपयोग झाला. याबद्दल या दोघांही गृहस्थांचा मी फार आभारी आ शिवाय रा. रा. टेंबे यांनीं पदांच्या चाली दिल्या व पुस्तकांत चित्रें घालण्याक आपल्या मंडळीचे फोटो घेऊं दिले; याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले पाहिजे

मिरज, ता. २९ जानेवारी सन. १९१७. } वासुदेव वामन खरे

भरत नाट्य संशोधन मंदिर
३१२, सदाशिव पेठ, पुणे

**प्रभावती:**—सख्यांनों, अनुरूप पति प्राप्त व्हावा म्हणून कुमारिकांनीं हा कामदेवाचा उत्सव दरवर्षास करायचा असतो, त्याप्रमाणें आम्हीं आज हा उत्सव सुरू केला आहे. पण या मदयंतीला आतां लवकरच तिच्या मनाजोगा नवरा मिळणारच आहे; तेव्हां तिचें नाहीं आतां या आमच्या उत्सवांत मन लागायचें !

**सौदामिनी:**—अगबाई ! मदयंतीचें का लग्न ठरलें आहे ? कसली लबाड आहे पण ! याबद्दल अगदीं अवाक्षर सुद्धां ही आजपर्यंत आमच्याजवळ बोलली नाहीं !

**चपला:**—अग, ती तशीच पहिल्यापासून पाताळयंत्री आहे, हें तुला नाहीं का ठाऊक ?

**मंदाकिनी:**—मदयंती, तर मग सांगच आतां आम्हांला, तुझें कोणाशीं लग्न ठरलें आहे तें ? त्या गृहस्थाचें नांव, गांव, कुळशीळ, ठाव, ठिकाण, धंदा, विद्या, रूप, गुण, धन, दौलत काय सगळी माहिती असेल ती एकदम सांगून टाक. पुन्हां पुन्हां विचारायला लावूं नकोस.

**चपला:**—मंदाकिनी, मी सारें सांगतें तुला. सुवर्णपुरचा व्यापारी धर्मनिधि म्हणून कोणी आहे, त्यानें इच्याबद्दल हिच्या बापाजवळ मागणी घातली आहे. अगदीं चांगले हिच्या मनाजोगे हौसेचे गृहस्थ मिळाले आहेत हो ! अगदीं सारा स्वयंवराचाच प्रकार घडला आहे म्हणे !

**प्रभावती:**—झालें तर. असा पति आपल्याला प्राप्त होणार ही मदयंतीची खात्री होऊन चुकली आहे; आणि म्हणूनच मीं मघांशी म्हटलें कीं, आमच्या या उत्सवाची तिला कांहीं आतां मौज वाटायची नाहीं.

**मदयंती:**—उत्सवाची मौज मला वाटत नाहीं असें कसें होईल ?



पण या उत्सवाचे आरंभीं आपण जी प्रार्थना केलीत ती मात्र मला नाहीं आवडली. म्हणे " लीना होऊं रमण-चरणीं ! " स्त्रीनें पतीवर जें प्रेम करायचें तें कांहीं त्याच्या चरणीं लीन होण्यासाठीं नाहीं करायचें ! समाजांत आपली मानमान्यता वाढावी, संपत्ति ऐषआराम यांचा उपभोग मिळावा, आपलें मन सदासर्वदा प्रसन्न असावें, आणि मनाप्रमाणें हौस मौज करायला सांपडावी, एवढ्यासाठींच देवाजवळ पति मागायचा, आणि त्यावर प्रेम करायचें बरें का !

**प्रभावती:**—मदयंती, स्त्रीनें पतीवर प्रेम कशाकरितां करावें, संसारसुखाचें स्वरूप कशा प्रकारचें असावें, याबद्दलचे तुझे विचार मीं एवढा वेळ ऐकून घेतले. पण तुला बजावून ठेवतें कीं, हे विचार तूं सोडून न देशील तर संसारांत तुझी निराशा झाल्याशिवाय राहणार नाहीं. स्वार्थसाधन हाच केवळ प्रेमाचा हेतु आहे असें तूं समजतेस; पण खरें प्रेम ज्याला म्हणतात त्याला हेतु मुळींच लागत नाहीं. आणि खरें पाहिलें तर जगाची रहाटी अशा निर्हेतुक प्रेमाबरच चालली आहे.

### पद.

राग—जिल्हा काफी. ताल—त्रिवट.

**जीवनरस प्रेम । पाप-हारि ।**
**जीवनरस प्रेम सदा शोभे दिनकरसम ।**
**छल-मल-लव हें न साहे ॥ ध्रु० ॥**
**लघु-चल-फल मिळवाया ।**
**पतिमन वळवावें म्हणासे हें प्रेम नोहे ॥ ३ ॥**

**मदयंती:**—ताईसाहेब, रागावूं नका. आपण निर्हेतुक प्रेम म्हणतां तें कसलें असतें हें कांहीं मला समजत नाहीं. प्रीति ही केवळ स्वतःच्या सुखाकरितांच आहे, कांहीं तरी स्वतःचा

फायदा दिसल्यावांचून ती दुसऱ्याला देणें हा वेडेपणा आहे, असेंच मला वाटतें. तें कसेंही असो. माझे विचार माझ्यापुरते. पण आपण ज्या खऱ्या प्रीतीचें एवढा वेळ वर्णन केलें, ती आपली प्रीति कोणा तरी भाग्यवानाला लवकरच प्राप्त होणार आहे, असें मीं परभारें ऐकलें. आपण मात्र मला त्यांतलें कांहींच कळवलें नाहीं, हें कसें काय ?

**प्रभावतीः**–( इतर सख्यांस ) सख्यांनो, जा पाहूं आरतीची तयारी करा, तोंपर्यंत आम्हीं येतोंच. जा, सगळ्या जणी जा. (सख्या जातात. ) मदयंती, माझ्या लग्नाबद्दल तूं काय काय ऐकलेंस तें सांग पाहूं.

**मदयंतीः**–मालव देशाचे अधिपति धुरंधर महाराज यांचा पुत्र माधव म्हणून आहे, त्याच्याशीं आपलें लग्न व्हायचें घाटतें आहे असें मीं ऐकलें. खरें ना पण हें ? आपण तर एवढा वेळपर्यंत कांहींच कळवलें नाहीं !

**प्रभावतीः**–मदयंती, तुला कळवण्याजोगें अजून जर कांहीं घडलेंच नाहीं, तर कळवूं तरी काय ?

**मदयंतीः**–छे बाई ! आपण कांहींच सुगावा लागूं देत नाहीं, हें चागलें नव्हे बरें का !

**प्रभावतीः**–( तिच्या गळ्यांत हात घालून ) गडे मदयंती, तूं आणि मीं जिवलग मैत्रिणी हें तर खरेंना ? माझा प्रभाकरदादा म्हणत असतो, कीं प्रभावती आणि मदयंती या जणूं काय विशाखा नक्षत्राच्या तारकाच ! जिथे एक असेल तिथे दुसरी असायचीच !

**मदयंतीः**–आणि माझे वडील म्हणत असतात, माझ्या यंतीला उन्हाची तिरीप लागली, तर राजकन्येचें तोंड कामजून जातें, आणि राजकन्येला कांटा लागला तर मदयंतीच्या डोळ्याला



पाणी येतें ! खरेंच ताईसाहेब, आपल्याविषयीं मला व माझ्याविषयीं आपणाला हें असें कां वाटतें ?

**प्रभावतीः**–गडे, ही आपली मैत्री अशीच आहे. ( परस्परांस आलिंगन देतात. ) हें जें आमचें प्रेम आहे, त्याचा बिघाड कोणाच्यानें तरी होईल का ग ?

**मदयंतीः**—( कामदेवाच्या मूर्तीकडे बोट दाखवून ) या कामदेवाच्या लीलेमध्यें प्रेम आणि वैर हीं दोन्ही उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे असें म्हणतात. पण या देवाच्या हातूनसुद्धां आमच्या प्रेमाची तातातूट करणें कधीं कधीं होणार नाहीं !

## पद.

राग–सोरट. ताल–त्रिवट.

**हा मदन मज मंद भासे ।**
**कलह करिन परम सुहृदिं अभिमान धरित ॥ ध्रु० ॥**
**प्रेम–भरें सुघटित अमुच्या मनिं ।**
**कोण निपजवि वैर अहित ॥ ४ ॥**

**प्रभावतीः**—सखे, देवतेची अवज्ञा करूं नकोस.

**मदयंतीः**—( हंसून ) यांत कसली मी अवज्ञा करतें आहें ? आम्हां दोघींमध्यें वैर उत्पन्न करण्याचा प्रभाव जर कामदेवाच्या लीलेमध्यें असलाच, तर त्यानें तसें करून दाखववें म्हणजे झालें !

**प्रभावतीः**–अशी जर आपली मैत्री आहे तर माझ्या लग्नासंबंधानें महत्त्वाचें म्हणण्याजोगें जर कांहीं घडलें असलें तर तें तुला सांगितल्याखेरीज मी कशी राहीन ?

**मदयंतीः**–पण आतांपर्यंत काय काय झालें आहे एवढें तरी सांगाल कीं नाहीं ?

**प्रभावतीः**–सांगायचें काय ? तिकडच्या माणसांनीं माझी तसबीर